या निकालामुळे दोन गोष्टी झाल्या. एक म्हणजे पेन्शन हा पेन्शनरांचा हक्क आहे व दुसरी म्हणजे सन्मानाने जगता येईल एवढी हवी. मध्यंतरी एका केंद्रीय मंत्र्याने वक्तव्य केले की, सरकारला पेन्शनचा बोजा अधिक काळ सहन करणे शक्य होणार नाही व वयाच्या ७५ वर्षानंतर पेन्शन बंद करायला हवी. यावर बराच गदारोळ झाला. पेन्शनर संघटनांनी कडाडून विरोध केला. ज्यावेळी केंद्र सरकारने ६वा वेतन आयोग लागू केला त्यावेळी केंद्र सरकारी पेन्शनर व फॅमिली पेन्शनरांना पेन्शनमध्ये भरघोस वाढ दिली. जर बँकिंग सेवा केंद्र सरकारच्या अखत्यारीत येतात तर मग बँक पेन्शनरांच्या पेन्शनमधे सुधारणा होणे आवश्यक आहे. विशेषत: स्टेट बँक ऑफ इंडियातील पेन्शनर व फॅमिली पेन्शन यांच्या अनेक न्याय्य मागण्या बऱ्याच वर्षांपासून सरकारी दफ्तरी पडून आहेत. सुप्रीम कोर्टात कांही केसेस प्रलंबित आहेत. केंद्र सरकारनेच पुढे होऊन हा प्रश्न सोडवायला हवा. पेन्शनर्स डे निमित्त सर्व पेन्शनरांना शुभेच्छा देऊन श्री.आर.आर.कुलकर्णी यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

**- आर.आर.कुलकर्णी,** अध्यक्ष (कोल्हापूर युनिट)

### अनुकरणीय

आपले मुंबई येथील सभासद कै.कमलाकर शंकर विचारे यांचे २५ ऑगस्ट २०१३ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पत्नि श्रीमती वंदनाताई यांनी पतिच्या इच्छेनुसार कै.कमलाकर विचारे यांचे नेत्रदान करून सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय आणून दिला. त्याबद्दल कै.कमलाकर विचारे व त्यांच्या पत्नि श्रीमती वंदनाताई या उभयतांचे असोसिएशनतर्फे अभिनंदन !

सेक्रेटरी

### अभिनंदनीय

आपले अमळनेर येथील सभासद श्री.केदार मो.ब्रह्मे यांचे ज्येष्ठ चिरंजीव ॲड.केदार ब्रह्मे हे उच्चशिक्षित असून (बी.कॉम., एल.एल.एम., एम.ए.(फिलॉसॉफी), डिप.इन ह्यूमन रिलेशन (दिल्ली) नुकतीच त्यांची विधी व न्याय मंत्रालय यांच्याकडून 'जिल्हा न्यायाधीश व असि. सेशन्स जज्ज' या पदावर नाशिक येथे नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल श्री.केदार यांचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा !

- सेक्रेटरी

### अभिनंदनीय

अमरावती येथील सभासद श्री.मोहन अंबुलकर यांची नात (मुलीची मुलगी) कु.सिध्दी श्रीकांत देशपांडे, वय ८ वर्षे, ही 'असोसिएटेड बोर्ड ऑफ द रॉयल स्कूल ऑफ म्युझिक' या लंडन येथील संस्थेतर्फे घेतली जाणारी व्हॉयोलिन वादनातील 'ग्रेड वन' ही परीक्षा प्राविण्यासह उत्तीर्ण झाली. ती सध्या पुणे येथील सिम्बॉयसिस प्रायमरी स्कूल मध्ये इयत्ता तिसरीत शिकत आहे. लहानपणापासूनच पुणे येथील 'सुझुकी स्कूल ऑफ व्हॉयोलिन' या संस्थेत ती भारतीय शास्त्रोक्त व्हॉयोलिन वादन शिकत आहे व वयाच्या ६ व्या वर्षीच तिने 'Book One' ही व्हॉयोलिन वादनातील परीक्षा पूर्ण केली. अगदी लहान वयातच कु.सिध्दीने प्राप्त केलेल्या व्हायोलिन वादनातील कौशल्याबद्दल तिचे हार्दिक अभिनंदन !

- सेक्रेटरी

## दातृत्वाचे मोल मोठे

देण्यातला आनंद घेण्यात नाही
घेण्यातले दु:ख देण्यात नाही
देण्यात गंमत असते मोठी
घेण्यातली गंमत ठरते छोटी
दानशूराचा दिसून येतो नि:स्वार्थ
घेणाऱ्याचा सिद्ध होतो स्वार्थ
दानी होतात भूषणाचे धनी
घेणाऱ्यांना लाभते दूषण जनी
घेणे देणे चालेल अखंड
दाते मात्र गाजवतील त्रिखंड
घेते न होता व्हावे दाते
कशास मन करावे कोते?

*शकुंतला ना. औटी, मुलूंड*
*फोन : ०२२ - २१६३८०६२*

०९८/१३

ONLY FOR SENIOR CITIZENS

JUST FOR RELAXATION
***COMFORTABALE HOME STAY @ ALIBAG***

**Aashiyana Resort**

**3 NIGHTS 4 DAYS**

EVERY MONDAY CHECK IN &
THURSDAY CHECK OUT

**RS:-2000/-PER PERSON**

INCLUDING** STAY+BREAKFAST + LUNCH & DINNER

CALL: RAJESH RANADE
9223434354- 9223273496

*Post Akashi-Alibag-Murud Rd-Near Amit Beer Shoppy*

*आपल्या सर्व समस्यांचे अचूक उत्तर,*
*सल्ला व मार्गदर्शन*
*संगणक कुंडलीद्वारे*
*(जन्म कुंडली, प्रश्न कुंडली)*
*पारंपारिक व कृष्णमूर्ती*
*पद्धतीने दिले जाईल !*



संपर्क :
निवृत्त स्टेट बँक अधिकारी
(व्ही.आर.एस. - कँग ब्रँच, मुंबई)
**श्री.चंद्रकांत प्र. देखणे**
**ॲस्ट्रॉलॉजर (के.पी.पद्धत)**
**मोबाईल : ९३२४८८४६६७**
एम्.ए.(इंग्लिश),बी.ए.(अर्थ); राष्ट्रभाषा पंडित, योग डिप्लोमा
(१ वर्षाचा) मुंबई सुगम संगीत गायक
ज्योतिष शास्त्री, के.पी. नक्षत्र अलंकार, नक्षत्र शिरोमणी
सर्टिफिकेट - के.पी. स्टेलर अस्टॉ. वर्कशॉप - के. हरिहरण, पुणे

**या शिवाय**

*मुक्तांगण निर्मित*
**श्री. चंद्रकांत देखणे** (भाव भक्तीगीत गायक)
सादर करीत आहे - राशीचक्रावर आधारीत
प्रबोधन व मनोरंजनात्मक
एकपात्री प्रयोग
**प्रेम रंग राशींचे**

*मुक्तांगण प्रस्तुत*
*सुमधूर भक्ती गीतांचा कार्यक्रम*
**भक्ती धारा**
बजेट तुमचे - कार्यक्रम आमचा !
कुठल्याही शुभ कार्यासाठी कार्यक्रम मिळेल.

- कार्यक्रमासाठी संपर्क -
**सौ. आसावरी चंद्रकांत देखणे,** मो.- ९३२४८८४६६७, ०२०-२४४८२२८१
पुणे - विश्वकर्मा अपार्टमेंट , ३३० नारायण पेठ, मोदी गणपतीच्या मागे, पुणे-४११०३०
डोंबिवली (पू) : १२ स्टेट बँक कॉलनी, पांडुरंग वाडी, मानपाडा रोड, डोंबिवली (पू) ४२१२०१

## Bank's List of Holidays during 2014

| Date | Day | Holiday |
|---|---|---|
| 14.01.2014 | Tuesday | Id E Milad |
| 26.01.2014 | Sunday | Republic Day |
| 19.02.2014 | Wednesday | Chhatrapati Shivaji Jayanti |
| 27.02.2014 | Thursday | Shivratri |
| 17.03.2014 | Monday | Holi |
| 31.03.2014 | Monday | Gudi Padwa |
| 08.04.2014 | Tuesday | Ram Navami |
| 13.04.2014 | Sunday | Mahavir Jayanti |
| 14.04.2014 | Monday | Ambedkar Jayanti |
| 18.04.2014 | Friday | Good Friday |
| 01.05.2014 | Thursday | Maharashtra Day |
| 14.05.2014 | Wednesday | Buddha Purnima |
| 29.07.2014 | Tuesday | Ramzan |
| 15.08.2014 | Friday | Independence day |
| 18.08.2014 | Monday | Parsi New Year |
| 29.08.2014 | Friday | Ganesh Chaturthi |
| 02.10.2014 | Thursday | Gandhi Jayanti |
| 03.10.2014 | Friday | Dussera |
| 06.10.2014 | Monday | Bakri Id |
| 23.10.2014 | Thursday | Diwali |
| 24.10.2014 | Friday | Diwali Bhaubeej |
| 04.11.2014 | Tuesday | Moharram |
| 06.11.2014 | Thursday | Guru Nanak Jayanti |
| 25.12.2014 | Thursday | Christmas |

*************************************************************************************************

## आता तरी तू येशील का?

वाट पाहता विरे चांदणे
आता तरी तू येशील का?
झुळुक वायुची होऊनी शीतल
आनंद मजला देशील का? ।।धृ।।

टाकी धरित्री उष्ण श्वास ते
नेत्री नभाच्या बाष्प साठते
कमलदलांवरी हळू ओघळते
पर्जन्याच्या त्या थेंबातील
सप्तरंग तू होशील का? ।।१।।

उषा लाजली बघ अनुरागे
फुलांफुलांवरी मधुपही जागे
सुवर्ण उधळूनी प्राची रंगे
सोनेरी ते किरण होऊनी
मन माझे उमलवशील का? ।।२।।

नृत्य करीता पैंजणातले
ऊर्वशीचे नुपुर विखुरले
पानांपानांवरी टपकले
दवबिंदूंचे रूप घेऊनी
क्षणैक येऊनी जाशील का ।।३।।

१०/१३ - **सौ. उज्वल र. ब्रह्मांडकर,** विरार

## संवाद लेखस्पर्धा २०१४

दर वर्षी प्रमाणे यंदाही 'संवाद' तर्फे लेख स्पर्धा २०१४ जाहीर करताना विशेष आनंद होत आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त सभासद/सहसभासद भाग घेऊन ती यशस्वी करतील अशी आशा आहे

स्पर्धेसंबंधी माहिती -

**१. विषय**

१) माझी समाजसेवा! इच्छा आणि कार्य

किंवा

२) जीवनातील आनंद योग

**२. शब्द मर्यादा -** आठशे ते एक हजार शब्द

**३. लेख पाठविण्याची अंतिम मुदत -** ३१ मार्च २०१४

स्पर्धेसाठीचे सर्व लेख ३१ मार्च २०१४ पर्यंतच आमचेकडे पोचतील अशा बेताने पाठवावेत. कोणत्याही कारणास्तव अंतिम मुदत वाढविली जाणार नाही.

**४. पारितोषिकांचे स्वरूप -**

पुरुष विभाग - प्रथम क्रमांक रु. ५००/-
द्वितीय क्रमांक रु. ३००/-
तृतिय क्रमांक रु. २००/-

स्त्री विभाग - प्रथम क्रमांक रु. ५००/-
द्वितीय क्रमांक रु. ३००/-
तृतिय क्रमांक रु. २००/-

इतर महत्त्वाच्या सूचना -

१) ही स्पर्धा केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशनच्या सभासदांसाठी व सहसभासदांसाठीच आहे.

२) लेखन आखीव फुलस्केप (पांढरा कागद) कागदावरच भरपूर समास सोडून, दोन ओळीत जास्तीत जास्त अंतर सोडून कागदाच्या एकाच बाजूस लिहिलेले असावे. पाठपोट लिहू नये. अक्षर वाचनीय असावे. लेखाच्या सुरवातीस उजवीकडील कोपऱ्यात लेखकाने आपले संपूर्ण नाव, पूर्ण पत्ता (पिनकोड नंबर सहित) सभासद क्रमांक, तारीख व फोन नंबर लिहावा. लेखाच्या शेवटी आपली सही, त्याखाली आपले संपूर्ण नाव, पूर्ण पत्ता, फोन नंबरसहित लिहिणे आवश्यक आहे.

३) लेखाची मूळ प्रतच पाठवावी. झेरॉक्स, कार्बनप्रत पाठवू नये.

४) र्स्धेसाठी लेख पाठवताना पाकिटावर मोठ्या अक्षरात 'संवाद' लेख स्पर्धा २०१४ असा स्पष्ट उल्लेख करून पुरेसे पोस्टेज लावूनच असोसिएशनच्या पुणे येथील पत्त्यावर पाठवावा. लेखाबरोबर इतर साहित्य, असोसिएशन संबंधीचा मजकूर पाठवू नये. त्यासाठी स्वतंत्र पाकिट पाठवावे.

५) ज्या सभासदांना / सहसभासदांना 'संवाद लेख स्पर्धे'त यापूर्वी पारितोषिक मिळाले आहे अशा सभासदांनी/सहसभासदांनी स्पर्धेसाठी लेख पाठवू नये. स्पर्धेसाठी लेख कृपया कुरिअर अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवू नयेत.

६) स्पर्धेसाठी लेख पाठवताना स्पर्धेसंबंधीचे सर्व नियम व अटींचे पालन केल्याची खात्री करूनच लेख पाठवावेत. सूचना व अटींचे उल्लंघन करून पाठवलेल्या लेखांचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही. याची लेखक सभासदांनी नोंद घ्यावी.

७) संपादक मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

८) स्पर्धेसाठी स्त्री/पुरुष विभागातून प्रत्येकी कमीत कमी २५ निबंध अपेक्षित आहेत. यापेक्षा कमी निबंध अल्यास स्पर्धेसंबंधी निर्णय राखून ठेवण्यात येईल.

स्पर्धेचा निकाल मे २०१४ च्या 'संवाद'मध्ये प्रसिद्ध होईल. विजेत्यांना पारितोषिके या वर्षीच्या सर्वसाधारण सभेत अध्यक्षांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील.

- संपादक मंडळ

## सुखाचा संदेश

सुख जवळ असताना
दुःखी कधी व्हायचे नसते
नव्या आयुष्याची सुरुवात करून
आनंदाने जगायचे असते
संकटाला सामोरे जाऊन,
धीराने तोंड द्यायचे असते
दिवसभर बसून आपले गाऱ्हाणे,
दुसऱ्याजवळ मांडायचे नसते
नव्या जोमाने काम करून,
यश पदरात पाडायचे असते
पुढील आयुष्य सुखात जाण्यासाठी
आजच सगळे सोसायचे असते
आपल्या अनुभवाच्या शिदोरीतून
दुसऱ्याचे जीवन फुलवायचे असते
हाच सुखाचा संदेश,
सगळ्यांना द्यायचा असतो
नांदा सौख्य भरे
नांदा सौख्य भरे

**- सौ. संध्या प्रितमसिंह परदेशी,** औरंगाबाद

**२३/१२** भ्रमणध्वनी - ९३२५२१८१२२

ललित

# आमची बबी

आपलं सगळं जपून नीट ठेवण्याची मला सवय होती. त्यातूनच मग सुंदर आकाराच्या अत्तराच्या बाटल्या, बांगड्यांच्या काचा, पेपरमधली कात्रणं, सुगरणींचे सल्ले, गाण्याच्या कार्यक्रमांवर आलेली माहिती, सुरेख भेटकार्ड, पत्रिकांवरील गणपतीची चित्रं, मोरपीस, पोस्टाची तिकीटं, निरनिराळी नाणी जमवायचा छंद जडला. ह्या सगळ्याबरोबर जुनी पत्रं पण होती. काही पत्रं चांगल्या अक्षराची म्हणून तर काही चांगल्या मजकुराची म्हणून जपून ठेवली होती. एक दिवस परत एकदा सगळं नीट ठेवावं म्हणून काढून बसले. आवरता आवरता पोस्टाचं एक पाकीट दिसलं. वर आमचा पत्ता व मागे तुमची बबी लिहिलेलं दिसलं. नाव पाहताच मन एकदम ४२ वर्षे मागं घेऊन गेलं.

१९७१ साली मी लग्न होऊन सासरी गेले. आई व वडिलांबरोबर बदलीच्या गावी कोकणात देवरुखला राहणारी मी नागपूरला विदर्भात गेले. नवीन घर, नवीन गाव, नवीन माणसांबरोबर राहायचं. नवीन घर, नवं गाव ह्याची तर सवय होती. आई-बाबांना सोडून कायमस्वरूपी इथेच राहायचं म्हणजे जरा कठीण वाटत होतं. मुलींना दुसऱ्यांच्या घरी जावंच लागतं. मुली म्हणजे दुसऱ्याचं, परक्याचं धन म्हणजे काय हे त्या दिवशी कळलं.

बघता बघता नव्या घरात नव्या वातावरणात रुळले. आता सारखे तेव्हा घरोघरी फोन व हातोहाती मोबाईल नव्हते. घरची मंडळी व आजूबाजूचे लोक पण चांगले होते. आमच्या घरची कामवाली गौराबाई (भांडीवाली) पण स्वभावाने चांगली होती. त्यांच्या सोबत त्यांची लहान ६-७ वर्षांची मुलगी पण कामाला यायची. बबी (चंद्रकला) तिचं नाव. का कोण जाणे मला ती फार आवडायची. नाक-डोळे नीटस. काळे कुरळे केस, गोल मटोल चेहरा, पाणीदार डोळे, सावळं सुंदर रुप होतं तिचं. पटकन डोळ्यात भरणारी चुणचुणीत होती आमची बबी.

पुढे ७२ व ७६ मध्ये मला मुलगा व मुलगी झाली. बबीला आमची मुलं फार आवडायची. ह्यांना प्रमोशन मिळालं व आम्ही अमरावतीस बदलून गेलो. अमरावती पण छान शहर होतं. एकविरा व रेणुका देवीचं गाव. इथंही यमुनाबाई व त्यांची १५ वर्षांची मुलगी गजरा दोघीही जीव लावणाऱ्या होत्या. भांडी सोडता सगळी कामं घरीच असायची. बंबफोड आणण्यासाठी लाकडाच्या टालावर, पिठाच्या चक्कीवर जायला लागायचं. ते यमुनाबाईंना आवडायचं नाही. टालावर व चक्कीवर त्या मला जाऊ द्यायच्या नाहीत. म्हणायच्या, ''तुमी चांगल्या घरच्या, तुमी चक्कीवर, लाकडाच्या टालावर जाऊ नका.''

बघता बघता ९ वर्ष निघून गेली. मुलगा १० वी व मुलगी ८ वी पास झाली. अचलपूर, चांदूर बाजार ब्रँच करून परत एकदा बिऱ्हाड पाठीवर म्हणतात तसं ट्रकमध्ये सामान घालून नागपूरला आलो. पूर्वी राहायचो तिथेच गोकुळ पेठेत नबाब गल्लीत जागा मिळाली. गौराबाई कामवाल्या जवळच राहायच्या. तिथे गेले. गौराबाई व बबीपण भेटली. तिने व मी एकमेकींकडे बघितलं. लग्न होऊन माझी बबी पारध्यांची झाली होती. १ मुलगी व १ मुलगा व आता परत दिवस गेलेले. बबीने पटकन घरात बोलावलं.

बबी, तिची एकच खोली. भिंती सारवलेल्या होत्या. जमिनीवर पांढरं पिवळं सारवण होतं. एकीकडे चूल त्यावर भात व वैलावर वरण शिजत होतं. बाजूलाच मांडणीत ठेवलेली लख्ख भांडी दिसली. कोपऱ्यात एकावर एक पितळेचे पिवळेधम्म पाण्याचे हंडे ठेवलेले होते. एक बाज त्याच्यावर दोरी बांधलेली त्यावर घरातले सर्वांचे कपडे ठेवलेले होते. बाजेखाली पत्र्याच्या दोन पेट्या. एवढाच पण नीट मांडलेला तिचा संसार. मला पाहून आश्चर्यानं म्हणाली, ''बाई कशा आल्या जी?'' मी म्हणाले, ''परत आलो बदलून.'' तशी लगेच मी कामाला येते म्हणाली. मी तिला म्हटलं, ''अगं तू अशी अवघडलेली. असं म्हणताच म्हणाली, ''जवळच तर हायजी तुमचं घर.'' लगेच घर बघायला आली. माझं आटपतंय तोच २ वाजताच कामाला हजर झाली. सोबत तिच्याच सारखी तिची मुलगी शीतल आणि मुलगा सतिशला घेऊन आली. मुलं अगदी गोड होती.

दोन जीवांची होती ना म्हणून तिला रोज काहीतरी खायला देऊ लागले. नवरा निर्व्यसनी होता. एका ऑफिसात कामाला जायचा. हळूहळू तिला समजावलं- ''बबे, अगं एक मुलगी, एक मुलगा आहे. आता तिसरं काहीही झालं तरी ऑपरेशन कर. ह्या तिघांना नीट मोठं कर. शाळेत घाल त्यांना शिकव.'' तिने नवऱ्याला समजावलं. नंतर सतिशचा छोटा भाऊ मनिषला घेऊन परत कामाला यायला लागली. कपाळावर, गालावर काजळाचा मोठा टिळा लावलेला, गुटगुटीत लोभस दिसायचा. बोळकं पसरून हसायचा.

बबीला शिक्षणाची आवड होती. पण घरच्यांनी ४ थी तच शिक्षण बास झालं म्हणून घरीच बसवलं. आमच्या घरी आली की, अंगणात फतकल मारून बसायची. पेपरमधल्या ठळक बातम्या व सिनेमाच्या जाहिराती वाचायची. सिनेमा पाहण्याची तिला फार हौस होती. आमच्याकडचं जेवण तिला व तिच्या मुलांना फार आवडायचं. एकदा म्हणाली, ''ढोसा येतो काजी तुम्हाले?'' मी म्हटलं, ''अगं केला की देईन तुला. तर म्हणाली, ''साऊथ इंडियन मेसमधून खाऊन येतो जी मी आणि फटक फटक चपला घासत निघून जायची.''

२९ मे ९२ ला आमचा मुलगा अपघातात गेला. दु:खाचा

डोंगरच कोसळला. त्यात सुद्धा ती माझी समजूत काढायची. सुख-दु:ख काहीही झालं तरी रोजची कामं करावीच लागतात. तेव्हा ती म्हणायची, ''बाई, तुम्ही कामं करू नका. मी करील सगले काम. तुमाले लोक हसतील जी. असं तिचं चौफेर लक्ष असायचं. मी तिला लहानाचं मोठं झालेलं पाहिलं होतं. तसंच तिने पण आमच्या मुलांना लहानाचं मोठं झालेलं बघितल होतं. आषाढ-श्रावण भाद्रपद गेला व दसरा गेला. दिवाळीत आमच्या मुलीसाठी फराळाचं घेऊन आली. माझी बबी समजूतदार, स्वच्छ, निर्मळ मनाची होती.

परत एकदा बदली होऊन नागपूर सोडायची वेळ आली. आमचं अमरावतीचं स्वत:चं घर बघायची तिची फार इच्छा होती. आम्ही निघताना खूप रडली. बाई तुमी मले भुलून जाल. पण किनई बाई मला न्हेमीच तुमची याद येनार हाए. कशी तरी तिची समजूत काढली आणि आम्ही नागपूर सोडलं. कधी नागपूरला गेले तर तिची भेट घ्यायची.

अमरावतीला येऊन ४ वर्ष झाली. मुलगी पदवीधर झाली. पुढचं शिक्षण व लग्नाचं पण बघायला लागलो. मुलगी लहान असताना बबी म्हणायची. इतली सुंदर नक्षेत्रासारखी दिसते आन गोरी गोरी हाय आपली पोरगी. कवा लग्न ठरलं पत्यापन लागायचा न्हाई.

चांगलं स्थळ मिळालं. लग्न ठरलं. आमंत्रण पत्र पाठवण्याची यादी केली. त्यात बबीचं पण नाव लिहिलं. सर्वांना पत्रं रवाना झाली. ८ दिवसातच लग्नाला येणार म्हणून पत्रं यायला लागली. त्यातच एक पोस्टाचं जाड पाकीट दिसलं. पाहते तर काय माझ्या बबीचं पत्र होतं. पाकीट फोडलं. त्यात १५० रु आणि एक चिठ्ठी होती. बाई आपली पोरगी नवरी होनार. तिच्यासाठी आन तुमालाबी काई घ्याल जी. मला लग्नाले यायची फार इच्छा आहे. पन घर लेकरांना कोन बघलजी माझ्या.

इतकी पत्रं आली होती पण सर्वात हे पत्र माझ्यासाठी विशेष होतं. तिने पाठवलेलं पत्र व पैसे जपून ठेवले मी. सर्वांनी लग्नात किमती वस्तू, साड्या, चांदीची भांडी बराच आहेर केला होता. पण ह्या सर्व आहेरापुढे बबीचा १-१ रुपया बाजूला ठेऊन केलेला प्रेमाचा आहेर मोलाचा वाटला आम्हा सर्वांना. ४-१०'' उंचीची छोटीशी बबी. पण तिचे विचार, तिचं मन फार पोचलेलं होतं. तिचा समजतदारपणा शहाण्यांना लाजवेल असाच होता. तिने पाठवलेल्या पैशाचं कायमस्वरूपी राहील असं ताट, वाटी, लोटी-भांडं असं मुलीला घेऊन दिलं.

मुलीच्या लग्नाची साडी, तिच्या यजमानांना शर्ट-पायजम्याचं कापड. मुलांना कपडे व खाऊ घेऊन नागपूरला गेले. लग्न व्यवस्थित पार पडल्याचं सांगितलं. तिच्याच घरी पाट-रांगोळी काढून आहेर दिला. अगं, बबी पैसे पोस्टाच्या पाकिटात पाठवायचे नसतात. मनिऑर्डर करायची असते. हे सगळं पाहून तिला धन्य वाटलं. पण तिच्यापेक्षा धन्य तर मी झाले होते.

ह्या गोष्टीला १५ वर्ष झाली. आता तिच्या यजमानांनी फुटाला तलावाजवळ ५ खोल्यांचं पक्क घर बांधलंय. सिमेंट-काँक्रीटच्या भिंतींचं. तिची मुलगी शीतल एम.सी.ए. झाली आहे. मुलं शिकली. व्हिडीओ शुटींगचं काम करतात. तिच्या घरी कुत्रा, मांजर, पोपट, बकरी असे सर्वजण गुण्यागोविंदाने राहतात. घरी फोन, सोफा, टि.व्ही. म्युझिक सिस्टीम आहे. सैंपाकघरात गॅस, कुकर, मिक्सरपासून अनेक वस्तू आहेत. तिच्या व यजमानांच्या कष्टाळूपणामुळे हे शक्य झालं. निर्व्यसनी नवरा, शहाणी मुलं आणि दूरदृष्टी असल्यामुळे आज ती सर्वजण सुखात आहेत.

परवाच नागपूरला गेले तेव्हा तिला फोन केला. अमरावती रोडला मैत्रिणीकडे होते. तिथे तिने मुलीला पाठवलं. तिचं घर व त्यातला आनंद बघून खूप बरं वाटलं. तिच्या शिकलेल्या मुलीला चांगला समजदार नवरा, घरी चांगली माणसं मिळू देत अशी देवाला प्रार्थना केली. पोहे आणि दूध घेऊन परत निघाले. मुलीला चांगलं स्थळ मिळावं म्हणून शुभेच्छा दिल्या. तिला साडी व बाकीच्यांना पाकिटात पैसे दिले. सर्वजण पटकन नमस्काराला वाकले. तिचे व माझेही डोळे पाणावले. पण हे डोळे पाणावणं आनंदाचं होतं. अशी आहे माझी बबी. तिची मला नेहमीच आठवण येत राहील.

**- सौ. निशा चिपळूणकर,** पुणे

६२/१३ भ्रमणध्वनी - ९८८१७७३७४१

* * * * * * * * *

## महागातले 'चार शब्द'

चांगला तासभर ह्या चटक चांदणीबरोबर तू हॉटेलात बसला होतास - मग काही जंमत जंमत केली का नाही. तुझ्या बरोबर ती काय काय बोलली? तुला हवेहवेसे वाटणारे ते चार जादुई शब्द तिने उच्चारले का नाही?''

उद्वीग्नपणे तो म्हणाला, 'संपूर्ण वेळ ती काहीना काही मागवून खात होती - तिने फक्त खाण्यासाठीच तोंड उघडले - परत निघताना पुन्हा एक भलं मोठं फॅमिली आईस्क्रीम पॅक मागवून घेतला..

''पण निघताना तरी तिने ते जादुई शब्द उच्चारले का नाही?''

वेटरनं भलं मोठ्ठं बिल आणून टेबलावर ठेवले तेव्हा पर्स उचलून घेत म्हणाली - तेवढं बिल दे ना?

अन् निघून गेली.

**- मधु रानडे** नाशिक

०६४/१३ भ्रमणध्वनी - ९८२२१४८०४

* * *

ललित

# आई तुझी आठवण येते

आपल्या आईबद्दल आदर-प्रेम नाही अशी व्यक्ती अगदी विरळाच. कारण आई आपणाला नुसता जन्मच देते असे नव्हे, तर अखेरच्या श्वासापर्यंत आपली ती काळजी घेत असते. एखाद्या प्रसंगी ती आपल्या मुलांसाठी स्वत:चा जीवही धोक्यात घालते. ह्याला पशुपक्षी प्राणी देखील अपवाद नाहीत. आपले सर्वस्वच ती अर्पण करते. आई म्हणजे प्रेम, सेवा, त्याग, भक्ती यांचे मूर्तिमंत रूप. तिने कमावलेल्या पुण्याची मोजणी करता येणार नाही. परमेश्वराकडे ती कधी स्वत:साठी काही मागत नाही. ती फक्त मुलांसाठीच मागत असते. ''देव जरी मज कधी भेटला, माग हवे ते माग'' म्हणाला, म्हणेन ''प्रभू रे माझे सारे जीवन देई, मम बाळाला.'' आमची आई अगदी अशीच होती.

दिवाळीमध्ये धनत्रयोदशीला माणिक वर्मांचे रेडीओवर गाणे ऐकले की, प्रत्येक वेळी आईच्या आठवणीने माझा ऊर भरून येतो. ''लावीते मी निरांजन, तुळशीच्या दारापाशी, आई तुझी आठवण येते, आज धनत्रयोदशी.''

आईची अनेक रुपे मी जवळून पाहिली आहेत. तिचा माझ्यावर खूप जीव होता. खरंतर, आपल्या सर्वच मुलांवर तिचे सारखेच प्रेम होते. आमचे दोन खोल्यांचे चाळीतील घर. ५ भावंडे म्हणजे आम्ही एकूण ७ माणसे एकत्र राहात होतो. सासर-माहेर दोन्हीकडची गरीब परिस्थिती. त्यामुळे आर्थिक आधार नव्हता. वडिलांची शिक्षकी नोकरी. त्यामुळे तुटपुंजा पगार. ते ही बिचारे, एक-दोन शिकवण्या घेऊन नोकरी सांभाळत होते. कधी उपाशी राहून, पोटाला चिमटा काढून, उधारीने घेऊन तर कधी कर्ज काढून घर चालवले जायचे. एखादा दागिना होता, तो ही वडिलांच्या आजारपणात तिने मोडला, विकला. मला आठवते, तिच्या गळ्यात एक काळ्या मण्यांची पोत व त्यातच ते मंगळसूत्र असे. कधी कधी फाटकी साडी, फाटका ब्लाऊज शिवून अंगावर चढवलेले, मी तिला पाहिले आहे. तिने स्वत:साठी कधी काहीच मागितले नाही. माझी मुले नीट शिकून मार्गाला लागू देत, त्यांच्या तब्येती चांगल्या राहोत, एवढ्यासाठीच तिची धडपड असे. तिचा स्वभाव अतिशय प्रामाणिक व सच्चा होता. त्यामुळे गावातील दुकानदार 'अण्णा महाजन' हे तिचे कितीही पैसे थकले तरी, ''ताई, तुम्ही सामान घेऊन जा, मुले शिकत आहेत ना, त्यांना उपाशी ठेवू नका. तुमच्यावर विश्वास आहे. जेव्हा जमेल तेव्हा फेडा पैसे'' असे म्हणत. आपणाकडून कुणाचे वाईट व्हावे, असे ती कधी वागली नाही की मुलांनाही तिने तसे शिकवले नाही.

तिने आपल्या मुलांना चांगले शिक्षण, संस्कार दिलेच, पण आपल्या नातवंडांनाही ते मिळावे म्हणून खूप कष्ट घेतले. गोरगरीबांची तिला विशेष कणव वाटे. मोठी होऊन मुले कमावू लागली, पैसे आले. म्हणून तिने गर्वही केला नाही. झोपडपट्टीत जाऊन, स्वत:कडील पैसे खर्चून ती गरिबांची सेवा करायची. त्यामुळे शेजारी-पाजारी, गोर-गरीब, नातेवाईक सर्वांचीच ती 'आजी' झाली होती. अनेक जातीधर्माचे लोक, चांगल्या कार्यासाठी तिच्या पाया पडण्यास येत असत व तिचा आशीर्वाद घेत असत.

स्वत:ला अनेक बारीक सारीक दुखणी असूनदेखील त्याकडे दुर्लक्ष करून ती इतरांच्या उपयोगी पडण्यास स्वत:ला धन्य मानत असे. कधी काही विनोद करून, खळखळून स्वत: पोटभर हसायची व घरातील इतरांनाही ती हसवायची. वरून म्हणे, 'हसा आणि लठ्ठ व्हा.' आम्ही कधी दु:खी असलो, तणावात असलो की प्रेमाने पाठीवर हात फिरवून धीर देत असे. कधी म्हणे, 'काळजी करू नका, वाईट होते ते त्याहून काही चांगले होण्यासाठीच असते. तिचे म्हणणे असे होते की, ''सत्कर्माच्या दिशेने गेलात, तर तुम्हाला कल्याणाचा मार्ग दिसेल.'' पैसा, संपत्ती, धनदौलत यासाठी आपसात भांडू नका. सर्व इकडेच सोडून जायचे आहे. एकमेकांचा हेवा करू नका. सुखदु:खाच्या प्रसंगी एकमेकांना मदत करा. एकत्र राहा.'' असा मोलाचा सल्ला तिने आम्हा भावंडांना दिला.

दहिसर नवागावच्या टेकडीवरील मारुती मंदिराची संकल्पना माझ्या आईचीच होती. तिथल्या किशोर व नवागावातील त्याच्या सवंगड्यांना तिने मारुती मंदिर बांधण्यासाठी आग्रह धरला. पहिली देणगी देऊन प्रोत्साहन दिले. त्यानंतर अनेकांनी देणग्या देऊन त्याचे रंगरुप वाढवले. दरवर्षी हनुमान जयंतीला तेथे थाटात उत्सव होत असतो आणि त्या उत्सवाच्या वेळी मला प्रकर्षाने आईची आठवण येते.

'चांगले संस्कार जपून, जगापुढे चांगला आदर्श ठेवा' असे ती आम्हाला नेहमी सांगत असे. तिच्या पुण्याची शिदोरी घेऊनच आज आमची वाटचाल चालली आहे.

- **सौ. चारुलता सावे,** दहिसर
भ्रमणध्वनी - ९८२०६९५०६४

* * * * * * * * *

एक डॉक्टर - प्रत्येक वेळी सर्जरी करायलाच पाहिजे यावर माझा विश्वास नाही. फक्त जेव्हा जेव्हा मला पैशाची आवश्यकता असते तेव्हाच मी सर्जरी करण्याचा सल्ला पेशंटला देत असतो.

- **वसंत धुपकर,** पुणे
०२०-२०२५५४०८

* * *

वडील (मुलास) : अरे गणेश, यंदा तुझे कॉलेजचे प्रथम वर्ष ना? काय फरक वाटतो तुला कॉलेज आणि शाळेत?

गणेश - बाबा शाळेत मी फार कमी दिवस गैरहजर राहायचो आणि कॉलेजला फार कमी दिवस हजर राहतो.

ललित

# माझी प्रभातफेरी

'गुडमॉर्निंग महाराष्ट्र' या विद्या बालनच्या गुडमॉर्निंगने सर्वांना वेडे केले. ते सूर, लयबद्धता, आवाजातील गोडवा यांनी मन मोहून जाते. गुडमॉर्निंगसारखेच 'मॉर्निंग वॉक' म्हणजेच प्रभातफेरीचे महत्त्व वाढले आहे. मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार या आजारांसाठी डॉक्टर 'चालणे' हे व्यायामाचे औषध अधिक गुणकारी आहे, हे पटवून देतात.

अर्थात हा अमूल्य सल्ला औषध म्हणून का होईना, निवृत्त झाल्यावर सकाळी ६॥ वाजता उठून, बूटमोजे घालून चालण्यास, 'प्रभातफेरीस' सुरुवात केली. सकाळी रस्त्याच्या कडेचे घाणेरडे वास, कचरा ह्यामुळे डोके भणभणून जायचे. मग पतिराजांनी स्वामी समर्थ उद्यानात छोटा जॉगिंग ट्रॅक आहे सांगितले. मग त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेवून तेथेच फिरायला जाण्याचे ठरवले.

मी बँकेच्या सोसायटीत राहते. गेटमधून बाहेर पडले की, घराला लागूनच शंकराचे मंदिर आहे. समोरच शाळेच्या प्रवेशद्वाराशी गणपती व शनिदेव आहेत. ''कैलासनाथा.... तुजविण शंभो मज कोण तारी?'' म्हणत व दोन्ही देवास नमस्कार करून प्रभातफेरीला सुरुवात होई. डाव्या बाजूस किंग जॉर्ज शाळा आहे. शाळा चालू असताना, विद्यार्थ्यांची घाईघाईने शाळेत यायची गडबड, एखादे पिताश्री आपल्या पाल्यास स्कूटर, कारने सोडतात, त्यांचे टाटा-टाटा, बाय-बाय पाहून बालपणीच्या आठवणी जागृत होतात.

''हरित मुंबई, स्वच्छ मुंबई'' असे अस्पष्ट लिहिलेले दिसणारी अस्वच्छ कचराकुंडी लागते. एखादा नारिंगी जाकीट घातलेला तरुण कचरा काढण्याचे नाटक करताना दिसतो, तर दुसरा एखादा मन लावून कचरा गोळा करताना दिसतो.

पुढे अग्निशामक केंद्राच्या मोकळ्या जागेत योगाचे वर्ग चालू असतात. प्रशिक्षक आत्मीयतेने योगाचे शिक्षण देतात व समस्त स्त्री-पुरुष मंडळी ते आत्मसात करण्याचा प्रामाणिकपणे आटोकाट प्रयत्न करीत असतात. ४-५ व्यक्ती खुर्चीवर बसून योगा करतात? खरंच शक्य आहे का ते? असो, आपणही आता जास्त वेळ खाली बसू शकत नाही. आपणही खुर्चीचाच उपयोग केला असता, असा विचार करून पुढे चालत राहते.

स्वामी समर्थ उद्यानात प्रवेश करते. सिडनहॅम कॉलेजमध्ये असताना पहिल्याच दिवशी मुख्याध्यापक श्री. बाळ ह्यांनी (Obseravation is the best education) म्हणजेच 'निरीक्षण हेच सर्वात उत्तम शिक्षण' हे बिंबवल्यामुळे माझी नजर नेहमी चौफेर फिरत असते, जास्तीत जास्त गोष्टींचे आकलन करून निरीक्षणशक्ती वाढवीत असते.

चालताना, पहिल्या बाकावर बसलेले आजी-आजोबा, दुसऱ्या बाकावर गळ्यात कंडक्टरसारखी बॅग अडकविलेली एक सिंधी बाई, नंतर तीन मद्रासी आजोबा त्यांच्या भाषेत गप्पा मारत असतात. पुढे असलेले गुलमोहराचे झाड बहरलेले दिसते ते पाहून आपल्या सोसायटीतसुद्धा बहरलेला गुलमोहर होता, हे आठवते. पुढे छोटेसे रुईच्या पाना-फुलांनी असलेले झाड पाहून, मन भूतकाळात जाते, आपण याच पाना-फुलांचे हार करून भुलेश्वराच्या पाचामुखी मारुतीला पाठवत असू व वडिलांना छोटासा आर्थिक हातभार लावत असू. हे आठवते.

'जुने ते सोने' म्हणतात ते खरंच आहे. या सोन्यासारख्या आठवणीसुद्धा मनाला सुखावून टाकतात. पुढे एका झाडाच्या खाली आलेल्या फांदीखालून मी मुद्दाम जाते. कारण पानांचा सुखद, हळूवार स्पर्श, मनाला आनंदित, उत्तेजित करतो.

एखादे जोडपे सुख-दुःखाच्या गप्पा मारतात. तर एखादी युवती कानाला मोबाईल लावून चालण्याबरोबर संगीताचीही मजा लुटत असते. ४-५ छोटी मुले भारताचे भावी क्रिकेटवीर या थाटात खेळत असतात.

प्रभातफेरीमुळे शरीराला आवश्यक 'डी' जीवनसत्त्व मिळते. निवृत्तीधारकांच्या मुंबईतील वार्षिक सभेत आमच्या वरिष्ठ चिकित्सा अधिकाऱ्यांनी 'तुम्ही रोज सकाळी फिरायला जा व 'डी' जीवनसत्त्व मिळवा' असा सल्ला दिला. त्याचे मी तंतोतंत पालन करते. स्वामी समर्थ जप करीत तीन फेऱ्या पूर्ण होतात व परतीच्या वाटेला सुरुवात करते, आठवते, एकदा माझे हात दुखत होते, मी वरखाली जोरात हलवीत होते. वाटले, अरे, आपल्याला कोण हसणार तर नाही?

परतीच्या वाटेवर योगाचा वर्ग संपण्याची वेळ. प्रशिक्षकांनी केलेला 'ओम्'चा उच्चार, त्यांच्या सुरात सूर मिसळून सर्वांनी एकत्र म्हटलेले 'ओम' ऐकले की, सर्वांगात सरसरून संवेदना आनंदाने जागृत होते, आपणही योगावर्गाचा अभ्यास करावा असे मनात येते. 'ओम'चा उच्चार हृदयात खोलवर रुतून बसतो.

वाटेत, ७० व्या वर्षीही पंजाबी पोशाख परिधान केलेल्या आजी फिरताना दिसतात. ओळखीच्या असतात, पण ओळखू येत नाहीत. किती परिवर्तन घडते, या पोशाखामुळे? आपणही ६० व्या वर्षी व्यायाम करण्यासाठी, साडी जी १८ व्या वर्षापासून आपली सखी सोबतीण आहे, त्या ऐवजी आरामदायक वाटण्यासाठी पोशाख घालण्यास सुरुवात करू.

परतीच्या वाटेवर मोठ्या बागेत नजर फिरते, तर एक माणूस अद्रक, खस, गाजर, पुदिना रस विकताना दिसतो, एखादा हाफ पँट, गाऊन विकत असतो. काही आजी-आजोबा गोलाकार बसून 'आयुष्यावर बोलू काही' अशा प्रकारे मनमोकळेपणे सुख-दुःखाच्या गप्पा मारतात. मध्येच एखाद्या विनोदाने हास्याची कारंजी उडतात.

झालं. आता पायातले त्राण संपलेले असते. 'आता माझ्या अंगात ताकद उरली नाही' या मंगेश देसाईंच्या 'फू बाई फू'च्या वाक्याच्या आठवणीने हसत हसत घरात प्रवेश करते व 'संपली आजची प्रभात फेरी, म्हणून आनंदीत होते.'

६०/१३

**- सुप्रिया गो. कुलकर्णी,** मुलूंड
भ्रमणध्वनी - ९९३०१२४७७७

## अग्नी क्षेपणास्त्र

अजिंक्य इच्छाशक्ती आणि अजिंक्य स्वाभिमान
राष्ट्रचरणी शास्त्रज्ञांचे, अमूल्य योगदान ।।धृ।।
'अग्नी' झाले अग्निपरीक्षा उत्तीर्ण
केले भारता सुरक्षेत स्वयंपूर्ण ।
'चक्रसुदर्शन' जणू झाले अवतीर्ण ।
कवचकुंडलाचे लाभले वरदान ।।१।।

'अग्नीसामर्थ्ये' शत्रूराष्ट्र दिपले
फाजील धाडस तयांचे गोठले ।
तेज पुरुषार्थाचे भारता लाभले ।
शास्त्रज्ञ, तंत्रज्ञांचा आम्हा अभिमान ।।२।।

सुरक्षेसह अखंडतेस प्राधान्य
राष्ट्रनिर्माणाचे आम्ही बघतो स्वप्न ।
प्रसंगी वैऱ्यांचेही हरतो विघ्न ।
आक्रमण रोखण्या, 'अग्नी'चे प्रक्षेपण ।।३।।

अमेरिका फ्रान्स वा रशिया चीन
यांच्यासम स्वावलंबी तंत्रज्ञान ।
स्वरक्षणार्थ सज्ज, 'अग्नीचे' उड्डाण ।
फुंकले तयाने, देहात पंचप्राण ।।४।।

अर्धे जग जरी 'अग्नीच्या' टप्प्यात
विश्वशांतीचे पाळतो आम्ही व्रत ।
हटवादी शत्रूचे हटवू अतिक्रमण ।
अग्नीसामर्थ्ये झालो आम्ही धैर्यवान ।।५।।

**- पुंडलिक भेंडे,** पुसद

**४३/१२** भ्रमणध्वनी - ९५५२२९२९०१

## अभिनंदनीय

आपल्या असोसिएशनचे पुणे येथील एक सभासद श्री. गजानन अराणके यांचा पहिलाच 'सांजकिरण' हा काव्यसंग्रह २४ नोव्हेंबर २०१३ रोजी अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. सौ. माधवी वैद्य यांच्याहस्ते प्रकाशित झाला. श्री. अराणके यांच्या कविता 'संवाद' मधूनही प्रकाशित झाल्या आहेत.

श्री. अराणके यांच्या या उपक्रमाबद्दल असोसिशनतर्फे हार्दिक अभिनंदन व त्यांच्या भविष्यातील काव्य लेखनास शुभेच्छा.

सेक्रेटरी

## चेहरा

गर्दीला चेहरा नसतो
गर्दीतला चेहरा असतो
ढगाआडचा चंद्र जसा
अधून मधून दिसतो ।।१।।

पहाटेची वेळ असते
प्राजक्ताचा सडा पडतो
डाळिंबीच्या ओठांमधून
मोत्याचा आभास होतो ।।२।।

थरकणारे अंग दिसते
आडोसा भिंतीचा असतो
विस्कटलेल्या केसांना
दिलासा पाठीचा असतो ।।३।।

द्वाड वारा वाहात येतो
धुळीचा कण डोळ्यात जातो
साठवलेल्या प्रतिमेला
तडा देत निघून जातो ।।४।।

अश्रूचा थेंब
गालावर, रेंगाळत राहतो
गर्दीतला चेहरा असतो
गर्दीतच निघून जातो ।।५।।

**- अरूण सावरकर,** मुंबई

**१२/१३** भ्रमणध्वनी - ९८१२८१२८३८

## लिफ्ट

मी बाहेर जाण्यासाठी स्कूटर काढली खरी. पण एकदम बाबांचा सल्ला आठवला. ते म्हणतात 'अरे पेट्रोल केवढं महागलंय एकट्यासाठी स्कूटर वापरू नये. आता जातोच आहेस तर रस्त्यात कुणी तिकडे जाणारा भेटलाच तर दे त्याला लीफ्ट.''

स्कुटरने जाता जाता एका बसस्टॉपवर थांबलो. स्टॉपवर उभ्या असलेल्या माणसाकडे बघत - रिक्शावाले जसे विचारतात तसं म्हणत - 'शिवाजीनगर, शिवाजीनगर करत स्कूटर हळूहळू चालवत होतो. इतक्यात एक वयस्कर गृहस्थ पुढे आले. म्हणाले, 'शिवाजीनगर ना?'

''हो हो. शिवाजीनगर. असं करा, सरळ जा- चौक लागेल - चौकातून डावीकडे वळा. तेच शिवाजीनगर स्टँड..''

**- मधु रानडे** नाशिक

०६४/१३ भ्रमणध्वनी - ९८२२१४८०४

****

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession Register No. PNCW/M-144/2014-2016
Permission to Post at Market Yard P.S.O. on 25th of each Month and published on 25th of the month

## मैत्री

जीवनाच्या वाटेवर मित्र भेटतात
सुखाची सोबत क्षणाची देतात
क्षणात भेटून निघून जातात
आठवणीत मात्र तेच राहातात
मनाच्या कोपऱ्यात ठसा उमटवतात
मैत्रीची जाणीव ठेवून जातात
काही इच्छा मोठ्या असतात
अर्धवट सोडून निघून जातात
काही काळाने स्मरणी येतात
डोळ्यात अश्रू हळूच येतात
मात्र तेव्हा ते नसतात
जगाच्या पडद्याआड लपून बसतात
मैत्रीच्या नात्यात अमर होतात

– शकुंतला ब. बेलेकर, कोल्हापूर
०२/१४ भ्रमणध्वनी – ९१४५६३९३०१

## समाधान

सेवानिवृत्तीची काही वर्षे सरल्या नंतर
वृद्धत्वाच्या पूर्वसंध्येला उमजून आलं
दुसऱ्यासाठी आपण काहीतरी करू शकतो
मग मनातल्या 'मीपणाचं' मळभट दूर सारलं!

एकमेका सहाय्य करूचा विचार केला आणि
सहकार्याची सकारात्मक भावना जागी झाली
वाटेवरील अडथळे संधी म्हणून स्वीकारले
तेव्हा समाधान हेच बळ वाटावयास लागले!

निराशेचं नकारात्मक प्रदूषण निघून गेलं
सदिच्छेचं कबुतर हवेत मोकळं सोडलं!
आपुलकीच्या सहजीवनाचा उत्साह जागा झाला
जगण्यासाठी जीवनात जीवंतपणा आला!

कधीतरी भीती, आम्हास पांगळं करीत होती
तेव्हा आमचा विश्वास, आम्हाला धीर देत होता
प्रयत्नांनी आमची पाठराखण सोडली नाही
मगच हात जोडत, ध्येय नतमस्तक झालं!

– **माधव नाडकर्णी**, मुंबई
**२२/१३** भ्रमणध्वनी – ९८१९०८९३८०

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

Printed Matter

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.